# अदाणी इलेक्ट्रिसिटीचा महामारी कोविड-19 च्या प्रसारादरम्यान मुंबईकरांना पाठिंबा

## एईएमएलकडून डिजिटल पेमेंट्स मोड्सची सुविधा, ग्राहकांना घरामध्येच राहण्याचे आणि सोशल डिस्टन्सिंग ठेवण्यायाचे आवाहन

■ **मुंबई**

केंद्र व राज्य सरकारने महामारी करोना व्हायरससंदर्भात जारी केलेल्या सूचनेनंतर एईएमएलने आपल्या ग्राहकांना घरामध्येच राहत डिजिटल पेमेण्ट मोड्स सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. ग्राहक घरामध्येच राहून सोशल डिस्टन्सिंग राखतील, या खात्रीसाठी कंपनीने सोसायटीमध्ये सेल्फ-हेल्प पेमेण्ट किओस्क, ड्राप बॉक्सेसची सुविधा दिली आहे. एईएमएलने महाराष्ट्र विद्युत नियामक महामंडळाला वितरण परवाना नियमन २००६, ८.६.८ च्या सामान्य स्थितींअंतर्गत महामारी आजाराच्या परिणामांचे निर्मूलन करण्यासाठी हाती घेण्यात येणाऱ्या उपकक्रमांबाबत देखील कळवले आहे.

एईएमएलला कोरोना व्हायरसमुळे सेवा निलंबित होणे, मूदतीपूर्वीच सेवा खंडित होणे, युटिलिटी कट-ऑफ्स याबाबत चिंता आहे आणि कंपनीकडे पुरवठा सुधार करण्यासंदर्भात आणि सुरक्षा संबंधित तक्रारी केल्या जात आहेत. ग्राहक अदाणी इलेक्ट्रिसिटी मोबाइल अॅपच्या माध्यमातून बिलसंदर्भात माहिती प्राप्त करू शकतात आणि १८००५३२९९९८ क्रमांकावर मिस्ड कॉल देत नो सप्लाय तक्रारींची नोंद करू शकतात. तसेच ग्राहक पेटीएम, गुगल पे, अॅमेझॉन पे, फोनप, बीएचआयएम, मोबिक्विक आणि फ्रीचार्ज अशा ऑनलाइन पेमेण्ट मोड्सच्या माध्यमातून बिल देयके भरू शकतात. ग्राहक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी मीटर रिडिंग, बिलिंग, बिल कलएक्शन, नवीन कनेक्शन्स जोडणी अशा मानवी इंटरफेससह इतर सेवा ३१ मार्च २०२० पर्यंत खंडित करण्यात आल्या आहेत. एईएमएल सतत स्थितीचे अवलोकन करत आहे आणि सद्यपरिस्थितीला अनुसरून सेवा पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करत आहे. एईएमएलचा प्रवक्ता म्हणाला, 'एईएएमएल कोविड-१९च्या प्रार्दुभावामुळे निर्माण झालेल्या स्थितीमध्ये ग्राहक व कर्मचाऱ्यांना पाठिंबा देण्याचे कार्य सुरूच ठेवेल. एईएमएल समस्या निराकरणासाठी पुरवठा व डिजिटल सेवा सुरूच ठेवेल आणि सुलभ पेमेण्ट सुविधा देईल. ज्यामुळे आमचे ग्राहक घरातूनच आरामशीरपणे या सुविधांचा लाभ घेऊ शकतील.'

महाराष्ट्रामध्ये या आजाराचे प्रमाण वाढत असताना आणि मुंबईमध्ये देखील विविध केसेसची नोंद होत असताना एईएमएलने वितरण सेवांवर प्रतिबंध करण्याची घोषणा केली. एईएमएलच्या वितरण व्यवसाय कार्यसंचालनांमध्ये विविध स्तरांवरील ग्राहक इंटरफेसचा समावेश आहे. पण जनहितार्थासाठी कंपनी त्यांचे कर्मचारी व ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाय घेत आहे.

मुद्रक आणि प्रकाशक भूषण बी. म्हात्रे यांनी मालक मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.साठी, एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घरटन पाड